# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 07.04.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या,**

1. **भाजपाप्रणित केंद्र सरकारची भ्रष्टाचाराविरोधात आघाडी, तिसऱ्या मुदतीत 100 दिवसांतच मोठे निर्णय घेणार पंतप्रधानांचं वक्तव्य.**
2. **काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे केवळ बोलाची कढी असल्याची पंतप्रधानांची टीका.**
3. **देशातल्या लोकशाही आणि राज्यघटनेच्या संरक्षणासाठी काँग्रेसची लढाई,काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा विश्वास.**
4. **भारतीय कम्युनिस्ट पक्षाकडून निवडणूक जाहीरनामा सादर.**
5. **कझाकिस्तान आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत अनुपमा उपाध्याय आणि एम. थरून एकेरीत विजेते.**

**आणि**

6. **महाराष्ट्रासह विविध  राज्यांत वादळी वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा.**

**प्रचार**

देशभरात विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभांना सुरूवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानच्या पुष्करमध्ये काल निवडणुकीच्या प्रचारसभेला संबोधित केलं. काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे बोलाची कढी असल्याचं सांगत, पंतप्रधान आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी भाजपा तिसऱ्यांदा सत्तारूढ होण्याचा विश्वास बोलून दाखवला. तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर पहिल्या 100 दिवसातच भ्रष्टाचाराविरोधात मोठे निर्णय घेणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षात यासाठी ज्या गोष्टी केल्या त्या केवळ एक झलक होती. भ्रष्टाचाराच्या उच्चाटनासाठी अनेक गोष्टी मार्गी लावण्याची गरज असल्याचं ते म्हणाले. यावेळी काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे खोट्या आश्वासनांची खैरात असल्याचं सांगून त्यामधून देशाच्या विभाजनाचा प्रयत्न दिसून येत असल्याची टीका मोदी यांनी केली. काँग्रेसकडे ना तत्व शिल्लक आहेत ना धोरणं. सर्व काही करारावर दिलं असल्याचं चित्र आहे. असा पक्ष देश कल्याणाचे कोणतेही काम करु शकणार नाही, या शब्दांत मोदींनी काँग्रेसवर हल्ला बोल केला. या सभेनंतर संध्याकाळी उत्तरप्रदेशच्या गाझियाबाद मध्ये झालेल्या प्रचारफेरीत पंतप्रधान सहभागी झाले होते. उत्तर प्रदेशचे

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ देखील यावेळी उपस्थित होते. येत्या 26 एप्रिलला उत्तर प्रदेशच्या या भागात मतदान होणार आहे.

**काँग्रेस प्रचार**

काँग्रेस पक्षाकडूनही काल जयपूरमध्ये प्रचारसभा घेण्यात आली. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी देशातल्या लोकशाहीचा बचाव करणे आणि राज्यघटना सुरक्षित ठेवणे यासाठी काँग्रेसची लढाई असल्याचं वक्तव्य या सभेत केलं. काल झालेल्या या सभेत न्याय पत्र नावाने काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. काँग्रेसने त्यांच्या 55 वर्षांच्या सत्ताकाळात विकासकामे केल्याचं सांगून काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, भाजपा सरकार मात्र काँग्रेसच्या काळात उभारलेल्या रेल्वे मार्गांवर रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्याचं श्रेय घेण्यात रमली आहे. या प्रचार सभेला काँग्रेसच्या माजी अध्यक्षा आणि ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधींनीही संबोधित केलं. देश काही लोकांची संपत्ती नसून तो सर्वांचा आहे. मात्र गेली दहा वर्ष बेरोजगारी, महागाई, आर्थिक संकट आणि विषमता यांना प्रोत्साहन देणाऱ्या सरकारच्या हाती देशाची सूत्र होती, अशी टीका त्यांनी सद्य सरकारवर केली.

**उमेदवार यादी**

काग्रेंस पक्षाकडून काल लोकसभेसाठी सहा उमेदवारांची यादी जाहीर झाली. उत्तर गोवा मतदार संघातून रमाकांत खलप, दक्षिण गोवा मतदारसंघातून कॅप्टन विरीआटो फर्नांडिस यांना उमेदवारी देण्यात आली आहे तर मध्यप्रदेशातून सत्यपाल सिंग सिकरवार यांना मोरेना मतदार संघातून आणि प्रवीण पथाळ यांना ग्वाल्हेर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

**भाकप जाहीरनामा**

भारतीय कम्युनिस्ट पक्षानं लोकसभा निवडणूक जाहीरनामा, काल दिल्लीत, पक्षाचे सरचिटणीस डी राजा यांच्या हस्ते प्रकाशित केला. या जाहीरनाम्यात, जुन्या निवृत्तीवेतन योजनेचे पुनरूज्जीवन करणे, नागरिकत्व कायदा म्हणजेच सीएए कायदा रद्द करणे यासाठी पक्ष काम करणार असल्याचं म्हटलं आहे,तसंच, खासगी क्षेत्रात आरक्षण सुनिश्चित करण्याबरोबरच सार्वजनिक क्षेत्रात समान संधी मिळण्यास चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहील. मनरेगा अंतर्गत किमान 700 रुपये वेतनवाढ देण्यासाठी तसंच एका वर्षात कामाचे दिवस दोनशे पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचं जाहीरनाम्यात म्हटलं आहे.
प्रसारमाध्यमांशी बोलताना डी राजा यांनी, आगामी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक संपूर्ण देश आणि देशाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून, मोदी सरकारनं सामान्यांना दिलेले अच्छे दिन चे आश्वासन पूर्ण केले नसल्याचा आरोप केला.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**लाओस**

लाओसमध्ये प्रलोभन दाखवून असुरक्षित आणि बेकायदेशीर कामात गुंतवलेल्या सतरा भारतीय कामगारांना मायदेशी परतण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी त्यांच्या समाजमाध्यमावरून दिली आहे. जयशंकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाओस मधील भारतीय दुतावासाच्या प्रयत्नांचे कौतुक केले असून लाओसच्या अधिकाऱ्यांनी या कर्मचाऱ्यांना मायदेशी पाठवण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आहेत.

**अमेरिका-चीन**

अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांचं संतुलित विकासासाठी मोठ्या प्रमाणात परस्पर देवाण-घेवाण करण्यावर एकमत झालं आहे. अमेरिकी कोषागाराच्या प्रमुख जेनेट एलेन यांनी चीनच्या दौऱ्यादरम्यान चीनी उद्योगांनी आपली धोरणं बदलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. चीनी उद्योग व्यापार वृद्धीसाठी करत राबवत असलेली धोरणं आणि त्यामुळे आर्थिक गैरव्यवहारांचा वाढता धोका आणि त्याला आळा घालण्यासाठी करायचे प्रयत्न याबद्दल चर्चा करण्याचं चीननं मान्य केल्याचं अमेरिकेनं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**विमान रद्द**

इंग्लंडमध्ये कॅथलीन वादळामुळे सुटलेलं जोरदार वारं आणि वर्षातला सर्वात उष्ण दिवस अनुभवाला आल्यानं प्रवाशांची अडचण झाली. काल डझनभर विमानउड्डाणे रद्द करण्यात आली त्यामुळे अनेक प्रवासी एडनबर्ग, बेलफास्ट, मँचेस्टर आणि बर्मिंगहॅम मध्ये अडकून पडले. हवामान विभागानं इंग्लंडच्या उत्तर पश्चिम, दक्षिण पश्चिम, उत्तर आर्यलंड, स्कॉटलंड आणि वेल्स भागासाठी पिवळा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर इंग्लंडवरून निघाणारी 130 विमान उड्डाणं रद्द करण्यात आली. सद्यस्थितीत संपूर्ण इंग्लंडमध्ये तापमानात वाढ नोंदवण्यात आली आहे. कॅथलीन वादळ आजही परिणाम दाखवेल अशी शक्यता आहे.

**मानवी तस्करी**

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग म्हणजे सीबीआयनं पूर्ण देशात पसरलेल्या अर्भक तस्करीमध्ये गुंतलेल्या तस्करांचं जाळं उद्धवस्त केलं आहे. या कारवाईचा भाग म्हणून सीबीआय नं हरियाणा आणि दिल्ली मध्ये सात ठिकाणी छापे टाकले. सीबीआयनं केलेल्या कारवाईत, अवघ्या दीड दिवसाचं एक पुरूष अर्भक, पंधरा दिवसांचं दुसरं अर्भक आणि एक महिना वयाच्या मुलीची सुटका केली आहे. या छाप्यामध्ये साडेपाच लाख रुपये रोख आणि इतर कागदपत्रांसह गुन्हेगारी शस्त्रं जप्त करण्यात आली आहेत. सीबीआय नं सात आरोपींना अटक केली. दत्तक देणे तसंच इतर बेकायदेशीर हेतूंसाठी देशभरात लहान मुलांच्या खरेदी विक्री करण्यात तस्करांचे जाळे गुंतले असल्याच्या आरोपावरून दहा आरोपींविरूद्ध सीबीआय नं फौजदारी गुन्हा नोंदवला आहे.

**एनआयए**
राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयए नं उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये काल माओवादी कम्युनिस्ट पार्टीशी संबंधित 11 ठिकाणी धाडी टाकल्या. उत्तर प्रदेशातल्या दहशतवाद विरोधी पथकानं या आधी सीपीआयवर देशद्रोहाच्या संशयावरून प्रथम माहिती अहवाल दाखल केला होता. एनआयए नं टाकलेल्या धाडींमधून मोबाईल फोन्स, सिम कार्डस् आणि नक्षलवादाशी संबंधित कागदपत्रं आणि प्रचारसाहित्य जप्त केलं.

**माओवादी**
छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांनं तीन माओवाद्यांना कंठस्नान घातलं. बिजापूर जिल्ह्याच्या दोल्लीगुडा जंगलात काल झालेल्या चकमकीनंतर सुरक्षा दलानं एक मशीन गन, एके 47 रायफल आणि दारूगोळा हस्तगत केला.

**हॉकी-मेघना**
भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील हॉकी सामन्यांच्या मालिकेतला दूसरा सामना आज ऑस्ट्रेलिया मधल्या पर्थ इथं होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार सामना दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी सुरू होईल. पाच सामन्यांच्या मालिकेतल्या काल झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला.

**बॅडमिंटन**
कझाकस्तानमधल्या अस्ताना इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धांमध्ये भारताच्या अनुपमा उपाध्याय आणि एम तरूण यांनी एकेरीचं अजिंक्यपद पटकावलं आहे. एम तरूण यानं मलेशियाच्या सुंग जू वेन याला 21–10, 21–9 असं सरळ गेममध्ये नमवून पुरुष एकेरीचं अजिंक्यपद मिळवलं तर महिला एकेरीच्या सामन्यामध्ये अनुपमानं स्वदेशी प्रतिस्पर्धी इशाराणी बरूआ हिच्यावर 21–15, 21–16 असा विजय मिळवला. मिश्र दुहेरीमध्ये मात्र भारतीय जोडी उपविजेता ठरली.

**हवामान**
महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, पश्चिम बंगाल आणि ओडिशा राज्यांत वादळी वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला असून धोक्याचा केशरी बावटा लावला आहे. या राज्यांमध्ये काही ठिकाणी गारा पडण्याचा अंदाज आहे. ईशान्य भारतात ताशी 50 किलोमीटर वेगानं वारे वाहतील आणि कमाल तापमानात 2 ते 3 अंशांची घट होईल. येते 5 ते 6 दिवस हीच परिस्थिती कायम राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. उत्तराखंडमध्ये तुरळक ठिकाणी हिमवृष्टी होण्याचा अंदाज आहे. देशातल्या बहुतांश भागात उष्णतेची लाट आली असून दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. कर्नाटक, गोवा, गुजरात, आंध्र प्रदेश, पुददूचेरी आणि केरळमध्ये उष्ण आणि दमट हवामान असेल.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.नमस्कार.**